


दैनिक अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २३३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०५ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## होर्मुझनंतर काय? इराणचं टार्गेट ठरलं! 'दु:खाचं द्वार' रोखून जगाला रडवण्याची तयारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, तेहरान :** मध्य पूर्वेत युद्ध सुरु होऊन महिना उलटला आहे. गेल्या महिन्याभरापासून इराणनं होर्मुझच्या सामद्रधुनीतून होणारी वाहतूक रोखून धरली आहे. त्यामुळे जागतिक सागरी व्यापार अडचणीत आला आहे. जागतिक तेल व्यापाऱ्यापैकी २० टक्के तेल वाहतूक एकट्या होर्मुझमधून चालते. हीच वाहतूक रोखून इराणनं जगातील अनेक देशांच्या नाकीनऊ आणले. खनिज तेलाचे दर गगनाला भिडल्यानं अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आल्या. यानंतर आता इराणनं आणखी एक इशारा दिला आहे. इराण आता आपल्या सामरिक व्यूहनितीचा विस्तार होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाढवून बाब अल-मंदेबपर्यंत करु शकतो, असे स्पष्ट संकेत इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गलिबाफ यांनी दिले. इराणनं बाब अल-मंदेबमधून होणारी वाहतूक रोखल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का बसेल. होर्मुझमधून २० टक्के तेल वाहतूक चालते. तर बाब अल-मंदेबमधून १२ टक्के तेल वाहतूक होते.

इराणी संसदेचे अध्यक्ष गलिबाफ यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट करुन जगभरातील देश आणि मोठ्या कंपन्यांची चिंता वाढवली आहे. 'जागतिक तेल, एनएलजी, गहू, तांदूळ आणि खतांच्या वाहतुकीपैकी किती वाहतूक बाब अल-मंदेबमधून चालते? कोणते देश आणि कंपन्या या मार्गावर अधिक अवलंबून आहेत?,' असे प्रश्न गलिबाफ यांनी विचारले आहेत.

**होर्मुझपासून बाब अल-मंदेबपर्यंत इराणची फिल्डींग**

इराणनं याआधीच होर्मुझमधून होणारी वाहतूक रोखत आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर दबाव टाकला आहे. यानंतर आता बाब अल-मंदेबमधून होणारी वाहतूक रोखली गेल्यास जगाच्या अर्थव्यवस्थेला जबरदस्त धक्का बसेल. होर्मुझच्या तुलनेत बाब अल-मंदेब जास्त अरुंद आहे. त्यामुळे हा जलमार्ग रोखणं जास्त सोपंदेखील आहे. या मार्गाच्या एका बाजूला येमेन आहे. येमेनमध्ये हुती बंडखोरांचं वर्चस्व आहे. या बंडखोरांना इराणचा पाठिंबा आहे.



बाब अल-मंदेब लाल समुद्र आणि एडनच्या आखाताला जोडतो. पुढे हाच मार्ग सुएझच्या कालव्यापर्यंत जातो. त्यामुळे आशिया आणि युरोप यांच्यातील व्यापार सुकर होतो. इराणचा पाठिंबा असलेल्या हुतींनी बाब अल-मंदेब रोखल्यास जगावर आणखी मोठं संकट कोसळू शकतो. इंधनाचे दर आणखी वाढू शकतात. सोबतच गहू, तांदूळ, खतांचे भावही वाढण्याचा धोका आहे.

**बाब अल-मंदेबचा अर्थ काय?**

बाब अल-मंदेब या अरेबिक शब्दांचा अर्थ अश्रूंचं द्वार किंवा दु:खाचं द्वार असा होतो. बाब अल-मंदेबच्या एका बाजूला येमेन, तर दुसऱ्या बाजूला सोमालिया, जिबुती हे देश आहेत. बाब अल-मंदेबमधून जाताना सागरी मार्ग अतिशय अरुंद होतो. या भागात वाऱ्याचा वेग प्रचंड असतो. त्यामुळे इथे अनेक जहाजं, बोटी बुडाल्या आहेत. त्यात अनेकांचा मृत्यू होऊन कित्येकांच्या घरांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळेच या भागाला दु:खाचं द्वार, अश्रूंचं द्वार असं नाव पडलं.

## एलपीजी चोरी प्रकरण उघड ; १.२६ कोटींचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि ०४, मुंबई :** शिधावाटप विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने मोठी कारवाई करत एलपीजी गॅस चोरीचा प्रकार उघडकीस आणला आहे. २ एप्रिल २०२६ रोजी मिळालेल्या माहितीनुसार नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या सूचनेवरून व गणेश बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वैजापूर रोडवरील मौजे खोजेवाडी शिवारात धाड टाकण्यात आली.

हॉटेल साईयश परिसरात केलेल्या या कारवाईदरम्यान एलपीजी टँकरचे सील तोडून गॅस चोरी करताना दोन व्यक्ती रंगेहात आढळून आल्या. तपासात एचपी कंपनीचे दोन कॅप्सूल टँकर (क्रमांक MH-43 / K-5921 d MH-43 / CK-5747) आढळले. या टँकरमध्ये अनुक्रमे १७,५९० किलो व १७,६३० किलो एलपीजी गॅस साठवलेला होता.

याशिवाय घटनास्थळावरून १९.२ किलो क्षमतेचे १७ भरलेले व ६ रिकामे सिलेंडर, १४.२ किलोचा १ भरलेला सिलेंडर तसेच ५ किलोचे २ भरलेले सिलेंडर जप्त करण्यात आले. एकूण ३५,२२० किलो एलपीजी गॅस, २ टँकर आणि २६ सिलेंडर असा सुमारे १ कोटी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दक्षता पथकाच्या माहितीनुसार, जप्त केलेल्या गॅसचा घरगुती वापरासाठी उपयोग केला असता सुमारे २४८० कुटुंबांची गरज भागू शकली असती. या प्रकरणी संबंधित आरोपींविरोधात छत्रपती संभाजी नगर, एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## ८ किलो ७९५ ग्रॅम गांजा जप्त ; दोघांविरुध्द गुन्हा दाखल !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखेला २ एप्रिल रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पोलीस रेकॉर्डवरील आरोपी अब्दुल शाहरूख अब्दुल रज्जाक (वय ३५), रा. दर्गावॉर्ड घुटकाला चंद्रपूर व त्याचा साथीदार मोबीन रा. चंद्रपूर यांनी रहमतनगर येथील केजीएन लॉनजवळील एका घरात भाड्याने खोली घेऊन गांजा साठवून ठेवला असल्याची माहिती मिळाली होती. चंद्रपूर शहरातील रहमतनगर परिसरात अंमली पदार्थांच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत सुमारे ८ किलो ७९५ ग्रॅम गांजा जप्त केला असून, या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ८९



हजार १५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ छापा टाकला. कारवाईदरम्यान, भाड्याने घेतलेल्या खोलीतून पिवळ्या रंगाच्या प्लास्टिक पोत्यामध्ये ठेवलेला गांजा हस्तगत करण्यात आला. एकूण ८ किलो ९१५ ग्रॅम वजनाच्या पदार्थामधून निव्वळ ८ किलो ७९५ ग्रॅम गांजा असल्याचे निष्पन्न झाले. तसेच गांजा भरण्यासाठी वापरलेले प्लास्टिक पिशव्या देखील जप्त करण्यात आल्या.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पार पडली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, सर्वेश बेलसरे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुंगीकारक औषधीद्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## रिक्षा परमिटासाठी आता मराठी भाषा अनिवार्य !



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०४, मुंबई :** राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आमदार नरेंद्र मेहता यांच्या रिक्षा परवाने व बॅच वितरण प्रक्रियेत होत असलेल्या कथित अनियमितता आणि बोगस कागदपत्रांच्या तक्रारींची गंभीर दखल घेतली आहे. यानुसार, मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रिक्षा परवाने व बॅच वितरणाची संपूर्ण पुनर्तपासणी करून १ मेपर्यंत अहवाल सादर करण्याचे कठोर निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यातील सर्व परिवहन अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीत मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले की, परवाने देण्याची प्रक्रिया ऑनलाइन असली तरी बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने दिल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. मीरा-भाईंदरचे आमदार नरेंद्र मेहता यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार, मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात गेल्या काही वर्षांत काही परदेशी नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने रहिवासी दाखले मिळवून रिक्षा व टॅक्सी परवाने प्राप्त केल्याचे आरोप आहेत. विशेषतः शहरातील डाचकुलपाडा, मांडवीपाडा येथील रहिवासी असल्याचे पुरावे सादर करताना विजेचे बिल हे आदानी कंपनीचे दिले आहे. परंतु या ठिकाणी टाटा पॉवरची वीज पुरवले जाते हे देखील त्यांनी अधोरेखित केले आहे. हि बाब अत्यंत गंभीर असून प्रत्येक प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

मीरा-भाईंदर परिसरात विशेष मोहीम राबवून मागील १० वर्षांत दिलेल्या सर्व रिक्षा परवान्यांची सखोल तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी महिनाभराचा विशेष कॅम्प आयोजित करून प्रत्येक कागदपत्राची बारकाईने छाननी करण्यात येईल. मोटार परिवहन विभागाच्या नियमांनुसार संबंधित परवाना धारकास मराठी भाषा येणे अनिवार्य आहे. प्रामुख्याने याची तपासणी करण्यात येणार आहे. अर्थात , चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. यासाठी आवश्यकतेनुसार मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी तैनात करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, सबब, बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने मिळाल्यास शहराच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असे नमूद करत मंत्री सरनाईक यांनी या प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहण्याचे आणि कोणतीही ढिलाई न करण्याचे निर्देश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना मागील काही वर्षांत दिलेल्या परवान्यांची तपासणी करण्याचे निर्देश दिले असून, या मोहिमेची सुरुवात मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## चंद्रपुरात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे दोन दिवसीय विभागीय अधिवेशन संपन्न

चंद्रपूर : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नागपूर विभाग अधिवेशन २८ व २९ मार्च २०२६ ला राजीव गांधी इंजिनिअरिंग कॉलेज बाबुपेठ, चंद्रपूर येथे मोठ्या थाटामाटात पार पडले. नागपूर विभागीय अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी नागपूर विभागाचे अध्यक्ष अजय वानखेडे हे होते. तर प्रमुख अतिथी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख उपस्थितीत नागपूर विभागाचे माजी शिक्षक आमदार नागो गाणार, माजी आ. सुधाकर कोहळे, मराशिप चे राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू, राज्य महिला आघाडी प्रमुख पुजाताई चौधरी, नागपूर विभाग (प्राथमिक) च्या अध्यक्षा रंजना कावळे, अधिवेशनाचे संयोजक तथा जिल्हाध्यक्ष चंद्रपूर (ग्रामीण) चे विलास खोंड आदींची मंचावर उपस्थिती होती.

या दोन दिवसीय विभाग अधिवेशनात २८ मार्च ला पहिल्या सत्रात राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी टी. ई. टी, संचमान्यता, समायोजन व जुनी पेंशन यावर विस्तृतपणे मार्गदर्शन केले. त्यामुळे बऱ्याच शिक्षकांच्या मनातील संभ्रम दूर झाल्याच्या प्रतिक्रिया दिसून आल्या. टी. ई. टी. ची भीती मनात ठेवू नये, संचमान्यता झाल्याशिवाय समायोजन करणे म्हणजे मराठी शाळांवर संकटे निर्माण करणे होय. विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू यांनीही उपस्थितांना आपल्या कोकणी भाषेत मार्गदर्शन केले. पुजाताई चौधरी यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात कार्यकर्त्यांची जडण-घडण यावर विनोद पांढरे यांनी विचार मांडले. तर दुसऱ्या सत्रात तक्रार निवारण याविषयी विभागाचे उपाध्यक्ष मधुकर मुप्पीडवार यांनी तक्रार कशी, कुणाकडे व कधी करावी,




न्याय कसा आणि कुणाकडे मागावा याविषयी मार्गदर्शन केले. तर तिसऱ्या सत्रात 'पंच परिवर्तन' या विषयावर शुभांगी मेंढे यांनी मार्गदर्शन केले तसेच या सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ तथा लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष रवीजी भागवत यांनी सांगितले की, समाजपरिवर्तनाचे काम शिक्षकच करु शकते. पिढी घडविण्याचे काम शिक्षकच करते. पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

अधिवेशनाच्या मुख्य उद्घाटन सोहळ्याप्रसंगी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद पांढरे यांनी केले. त्यानंतर प्रमुख अतिथी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, शिक्षकांच्या न्याय मागण्या तसेच बदलत्या शैक्षणिक आणि तांत्रिक आव्हानांचा विचार करत, संवादाच्या माध्यमातून तोडगा शोधण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे, मात्र, आवश्यकतेनुसार संघर्षांचीही भूमिका स्विकारत शेवटी समाधानाकडे वाटचाल करणे गरजेचे आहे, असे त्यांनी ठामपणे अधोरेखित केले. माजी आमदार सुधाकर कोहळे यांनी सांगितले की, नागपूर विभाग पदवीधर निवडणूकीच्या संदर्भात विभागातील पदवीधरांची मोठ्या प्रमाणात नोंदणी करुन आपला उमेदवार निवडून कसा येईल यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी केले. मराशिपचे नागपूर विभागाचे माजी शिक्षक आमदार तथा राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी अधिवेशनात टी. ई. टी, संचमान्यता, समायोजन, जुनी पेंशन योजना यावर मार्गदर्शन केले. शिक्षण क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्या, अडचणी यावर तोडगा काढण्यासाठी शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी संघटनेच्या पाठीशी ताकदीने उभे राहण्याचे आवाहन केले. शिक्षक संघटनेला अधिक बळकट करण्याची गरज आहे. अन्यथा मराठी माध्यमांच्या शाळांचे अस्तित्व टिकवून ठेवणे कठीण होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय वानखेडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.याप्रसंगी शिक्षक भारती संघटनेच्या सन्माननीय पाच पदाधिकारी यांनी विभागीय अधिवेशनात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत प्रवेश केला. त्यामध्ये मिलिंद भास्करराव सरोदे, वर्धा, विभाग पदाधिकारी, रविंद्र विठ्ठलराव उईके, वर्धा जिल्हा पदाधिकारी, हेमंत प्रभाकर माटे, वर्धा, जिल्हा पदाधिकारी, प्रा. सुलभा प्रवीण कडू, जिल्हा पदाधिकारी, प्रा. प्रवीण वसंत कडू, जिल्हा पदाधिकारी यांचा समावेश होता. त्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन मृणाल पनके, आभार संयोजक विलास खोंड यांनी केले. तर अधिवेशनाचा समारोप पसायदानाने करण्यात आला.

अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी रामदास गिरटकर, वसंत वडस्कर, विपीन मानकर, विठ्ठल राजूरकर, विलास खोंड, सरिता सोनकुसरे, देविदास चवले, स्नेहल बांगडे, अश्विनी पिंपळापुरे, दिलीप मॅकलवार, संतोष कुमरे, विवेक आंबेकर, संतोष सोनवणे, आदींनी परिश्रम घेतले. अधिवेशनाला विदर्भातील मुख्याध्यापक, संघटनेचे आजी-माजी पदाधिकारी, शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## सोलापुरात भीषण अपघात!

**दि.०४, सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील नातेपुते परिसरात नीरा उजवा कालव्यात शुक्रवारी पहाटे कार कोसळून भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून, चालक थोडक्यात बचावला.

मुंबईहून फोंडशिरसकडे जाणारी कार शुक्रवारी पहाटे सुमारे चार ते पाचच्या दरम्यान जुन्या पालखी मार्गावरील पुलावरून जात होती. या वेळी चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट नीरा उजवा कालव्यात कोसळली. अपघात भीषण होता. त्यानंतर कारमधील प्रवासी बाहेर पडू शकले नाहीत. पोलिस सूत्रांकडून व घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात प्रीती टिळेकर (३०), मंजुळा जठार (५०) आणि हनुमंत जठार (५५) यांचा मृत्यू झाला. मंजुळा आणि हनुमंत जठार हे मोगराळे (ता. माण) येथील रहिवासी असून, ते सध्या मुंबई येथे वास्तव्यास होते. प्रीती टिळेकर (सध्या रा. खारघर, मुंबई) ही त्यांची मुलगी होती. सुनील टिळेकर गाडी चालवत होते. ते सुदैवाने या अपघातातून बचावले. अपघातानंतर ते गंभीर जखमी अवस्थेत बाहेर आले. त्यांना तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले. कार पाण्यात बुडाल्याने इतर तिघांचा जागीच मृत्यू झाला.




## प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारे कलाकार



हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी ४ एप्रिल २०२५ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवर शोककळा पसरली होती. मनोज कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीतील एक नावाजलेले कलाकार होते. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले दशभक्तीवरील चित्रपट त्याकाळात खूप गाजले होते. मेरे देश की धरती..., सरफरोशी की तमन्ना...., एक प्यार का नगमा है...., पाणी रे पाणी तेरा रंग कैसा... अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात.

मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते होते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचा मोठा प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटातील त्यांनी भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली.

आपला पहिलाच देशभक्तीपर चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान...जय किसान.... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट त्या काळात खूप गाजला. या चित्रपटातील गाणी तर खूप गाजली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गाणे याच चित्रपटातले. उपकार नंतर पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद में या देशभक्तीपर चित्रपटांची निर्मितीही त्यांनी केली हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारतकुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट खूप गाजले होते.

शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप गाजले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च अशा दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरविण्यात आले. १९९२ साली भारत सरकारने पद्मशी हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा कलाकार काळाच्या पडद्याआड गेला असेच म्हणावे लागेल. मनोज कुमार यांचा सारखा कलाकार पुन्हा होणार नाही. प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारे जेष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# सोशल मीडिया आणि जनतेचा मेंदू...?

आजचा जमाना हा सोशल मीडियाचा आहे. कधीकाळी रेडिओ, टेलिव्हिजनने जनतेच्या केवळ ड्रॉईंगरुमचा ताबा घेतला होता. परंतु स्मार्टफोनच्या माध्यमातून सोशल मीडियाने जनतेच्या संपूर्ण मेंदूचा ताबा घेतला आहे. युजर घरात असो वा दारात, ऑफिसमध्ये किंवा प्रवासात, अगदी स्वच्छतागृहात बसूनही तो सोशल मीडिया हाताळत असतो. मनोरंजनाच्याही पलीकडे तो त्यातून आपली मते बनवत असतो. अत्यंत प्रभावी असलेल्या या सोशल मीडियाचा वापर जसा अजेंडे, नॅरेटिव्ह सेट करण्यासाठी होतो तसाच तो खोटे नरेटिव्ह, फसवी माहिती खोडून काढत पडद्यामागचे सत्य लोकांपुढे आणण्यासाठीही केला जात आहे. इंडिपेंडेंट क्रिएटर्स, सोशल मीडिया एन्फ्लूएन्सर्सचा दबदबा सोशल मीडियात तयार झाला आहे. हा दबदबा मोडीत काढण्यासाठी आता केंद्र सरकार पावले उचलत आहे.



केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने आयटी नियम २०२१ मध्ये नुकताच बदलांचा नवीन मसुदा जारी केला आहे. या मसुद्यात अनेक नवीन आणि कठोर तरतुदी जोडण्यात आल्या आहेत. या तरतुदींच्या माध्यमातून केंद्र सरकार डिजिटल जगतातील कंटेंट क्रिएटर्स, एन्फ्लूएन्सर्सभोवती कारवाईचा फास आवळण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे या मसुद्याला सध्या जोरदार विरोध होत आहे. प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. कधीकाळी सरकार आणि जनतेच्या मधला दुवा अशी माध्यमांची प्रतिमा होती. अँटी एस्टॅब्लिशमेंट किंवा सत्तेविरोधात भूमिका घेऊन प्रसारमाध्यमे कुठल्याही चुकीच्या धोरणा-निर्णयाविरोधात आवाज उठवून सरकारच्या डोळ्यात अंजन घालायचे. शोध पत्रकारितेची मोठी परंपरा भारतीय मीडियाला होती. परंतु मागच्या काही वर्षाम ध्ये देशातल्या बहुतांश मुख्य प्रवाहातील प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियातून केवळ सरकारच्या सोयीचा असाच कंटेंट दाखवण्याचा, पेरण्याचा प्रवाह रुळला आहे. सत्ताधाऱ्यांच्या विचारसरणीशी सुसंगत किंबहुना सरकारधार्जिण्या कंपन्यांनी देशातल्या मीडिया हाऊसेसमध्ये पसरलेले हातपाय हे यामागचे मुख्य कारण. त्यामुळे सरकारच्या हातचे बाहुले अशी समस्त भारतीय प्रसार माध्यमांची स्थिती झालेली आहे. कुठलीही वृत्तांकने किंवा डिबेट शोमध्ये याचा पुरेपूर प्रत्यय येतो. याउलट सरकारी निर्णय धोरणांना विरोध करणाऱ्या प्रसार माध्यमांना एकतर सरकारी जाहिरातींपासून मुकावे लागते किंवा त्यांच्यामागे कारवाईचा ससेमिरा लागलाच म्हणून समजा. मागच्या काही वर्षांमध्ये निष्पक्ष पत्रकारितेच्या नावाखाली मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांमधून बाहेर पडून अनेक पत्रकारांनी आपापले स्वतंत्र युट्यूब चॅनेल सुरू केलेत. त्यातून ते सरकारच्या चुकीच्या निर्णयांविरुद्ध आवाज उठवत असतात. पडद्यामागील सत्य लोकांसमोर आणत असतात, चुकीचे नॅरेटिव्ह खोडून काढत त्याची विश्लेषणात्मक चिरफाड करत असतात. त्याशिवाय असे अनेक कंटेंट क्रिएटर्स, सोशल मीडिया एन्फ्लूएन्सर्स आहेत जे आपापल्या पद्धतीने कधी व्यंगात्मक, कधी गंभीर मुद्दे उपस्थित करून जनतेचे प्रबोधन करतात. मात्र, यामुळे अडचणीत येणाऱ्या सरकारने अशा सगळ्यांना कायद्याच्या कचाट्यात अडकवण्याचा घाट घातला आहे. करणाऱ्या सोशल मीडिया कंपन्यांसाठी आहेत. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास मध्यस्थ म्हणजे असे प्लॅटफॉर्म जिथे एखादा कंटेंट क्रिएटर्स कंटेंट तयार करून पोस्ट करतो आणि तो कंटेंट युजर्सपर्यंत अर्थात लोकांपर्यंत पोहोचतो. व्हॉट्सअॅप आणि टेलिग्रामसारखे मेसेजिंग अॅप्स, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्ससारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, गुगल आणि यूट्यूबसारखे सर्च आणि व्हिडिओ प्लॅटफॉर्म, अॅमेझॉन आणि फ्लिपकार्टसारखे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि नेटफ्लिक्स व प्राईमसारखे ओटीटी प्लॅटफॉर्म हे सर्व या श्रेणीत येतात. तुम्ही ऑनलाईन वापरत असलेल्या जवळपास प्रत्येक सोशल मीडियाला हा नियम लागू होईल. या मसुद्यातील तरतुदींमुळे कुठलाही सोशल मीडिया, टेक आणि डिजिटल प्लॅटफॉर्म यापुढे मनमानीपणे वागू शकणार नाहीत. त्यांना सरकारी निर्देश, मार्गदर्शक तत्त्वे, अॅडव्हायझरी पाळाव्याच लागतील. जर त्यांनी असे केले नाही, तर संबंधित डिजिटल मीडिया कंपन्यांना थेट जबाबदार धरले जाईल. या मसुद्यातल्या नियम ८वर सर्वाधिक आक्षेप आहे. याअंतर्गत आता बातम्या आणि चालू घडामोडींच्या कंटेंटची अधिक काटेकोरपणे तपासणी केली जाईल. हे नियम आता केवळ वृत्त प्रकाशकांपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर सामान्य युजर्स जिथे ते असा मजकूर शेअर करतात त्या प्लॅटफॉर्मनाही लागू होतील. याचा अर्थ असा की, जर एखाद्या वापरकर्त्याने युट्युबवरील बातम्यांसंबंधीचा व्हिडिओ किंवा बातमी व्हॉट्सअॅपवर फॉरवर्ड केली किंवा फेसबुकवर एखादी स्टोरी शेअर केली, तर तो प्लॅटफॉर्म कारवाईसाठी जबाबदार धरला जाईल.

सोशल मीडियावर मागच्या काही दिवसांपासून एक व्हिडिओ खूपच व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ पंतप्रधानांवर व्यंगात्मक टीका करणारा असल्याचे म्हटले जात आहे. या व्हिडिओत परदेशी राष्ट्रप्रमुखाला भेटून पंतप्रधानांची व्यक्तिरेखा साकारणारा केवळ हसताना दाखवलेला आहे. ही व्यंगात्मक टीका सरकारला झोंबल्यानंतर हा व्हिडिओ तात्काळ सोशल मीडियावरून काढून टाकत संबंधित अकाऊंट ब्लॉक करण्यात आले. तरीही विविध माध्यमातून हा व्हिडिओ व्हायरल झालाच. मागच्या काही दिवसांमध्ये हा व्हिडिओ सर्वाधिक व्ह्यूज मिळवणारा ठरला आहे. मध्यंतरी सरकारवर टीका करणारे असे बरेचसे युट्यूब चॅनेल व सोशल मीडियावरील अकाऊंट ब्लॉक करण्यात आले. सरकारसाठी अडचणीचे ठरणारे निष्पक्ष पत्रकार आता निशाण्यावर आहेत. म्हणूनच पुढचे पाऊल म्हणून हा कायद्यात बदल केला जात आहे. जेणेकरून मुख्य प्रवाहातील माध्यमांसोबतच सोशल मीडियाचीही मुस्कटदाबी करावी. निंदकाचे घर असावे शेजारी असे आपले संत महात्मे म्हणायचे. परंतु आजकाल सरकारवरील टीका म्हणजे देशावर केलेली टीका समजून त्याला देशद्रोही समजले जाते. आपण कधीच चुकू शकत नाही, असा भ्रम पाळणारे सत्ताधारी कितीही झाकले तरी कोंबडा आरवायचा रहात नाही, हे विसरले असावे. १४ एप्रिलपर्यंत केंद्र सरकारने या मसुद्यावर सार्वजनिक सूचना, हरकती मागवल्या आहेत. मात्र, सोशल मीडियावरील या सेन्सॉरशीपला देशातून जोरदार विरोध होईल, असेच दिसते.

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर**

# युद्ध थांबवा,लोक वाचवा!

अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणवर हल्ला करून युद्ध सुरू होऊन ३३ दिवस पूर्ण झाले आहेत. या एक महिन्याहून अधिक कालावधीत सुमारे २००० लोकांचा जीव गेला आहे, तर आर्थिक हानी अगणित झाली आहे. इराणचे सर्वोच्च नेतेही या युद्धात मारले गेले आहेत. जगावर आता तिसऱ्या महायुद्धाचे संकट घोंगावत आहे. ऊर्जा संकटामुळे पाकिस्तानसह अनेक देशांमध्ये लॉकडाऊनसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहू यांचा इराणला संपवण्याचा हेतू अत्यंत हिंसक आहे. युद्धामध्ये सामान्य लोक किड्या-मुंग्यांप्रमाणे मारले जातात. युद्धाची सर्वाधिक झळ लहान मुले आणि स्त्रियांना सहन करावी लागते. लहान मुलांच्या मनावर आणि भावनांवर युद्धकाळात विपरीत परिणाम होतो. त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. सतत भीतीच्या सावटाखाली राहिल्यामुळे मुले आपल्या क्षमतांचा विकास करू शकत नाहीत. लांबलेल्या युद्धामुळे अख्खी एक पिढी उद्ध्वस्त होऊ शकते. युद्धकाळात स्त्रियांवरील हिंसाचाराच्या घटनाही वाढतात. अन्नटंचाईमुळे भूकबळींची संख्या वाढते.

युद्धामध्ये कधी कोणती परिस्थिती निर्माण होईल, हे सांगता येत नाही. मानवी जीवनच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीच अनिश्चिततेच्या उंबरठ्यावर येऊन उभी राहते. एकाने गाय मारली तर दुसरा वासरू मारतो, अशी सूडाची साखळी निर्माण होते. बदल्याच्या आगीत लाखो निष्पाप जीव होरपळून निघतात.

खरं तर कोणत्याही युद्धामागील कारणे शोधून पाहिल्यास, लोकांचे हित, सुरक्षा, स्वातंत्र्य आणि सुखी जीवन यांचा केवळ आभास निर्माण केला जातो. मार्क्सवादी सिद्धांतानुसार, वस्तुनिष्ठ भौतिक स्वारस्यामुळे लोक नेहमी प्रोत्साहित होतात आणि आणि ही स्वारस्य लपवण्यासाठी आणि विरोधकांना गोंधळात टाकण्याकरता केवळ कथांचा वापर केला जातो. आजपर्यंतची अनेक युद्धे धार्मिक, राष्ट्रवाडि किंवा उदारमतवादी आदर्शांसाठी नव्हे, तर सत्ताधारी अभिजनांच्या आर्थिक स्वारस्यांकरता लढली गेली आहेत. ही युद्धे समजून घेणे म्हणजे देव, राष्ट्रभक्ती किंवा लोकशाही याबद्दलची पुराणकालीन वाळकी पान बाजूला सारणं आणि नग्नपणे सत्ता संबंधांचे निरीक्षण करणे होय. इराणविरोधातील अमेरिका-इस्रायल युद्धाचा नेमका उद्देश काय आहे, हे तपासणे आजच्या घडीला आवश्यक आहे.



इराणविरोधात युद्ध सुरू झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात युद्ध संपवण्याचे आश्वासन दिले असले, तरी त्यांनी नजीकच्या काळात मोठे हल्ले करण्याची धमकीही दिली आहे. इराणला अश्मयुगात नेऊ अशी भाषा त्यांनी वापरली आहे. आता ते इराणमधील वीज निर्मिती प्रकल्प, जलशुद्धीकरण यंत्रणा आणि खारे पाणी गोडे करणारे प्रकल्प उद्ध्वस्त करण्याची धमकी देत आहेत. कोणत्याही युद्धात नागरी जीवनावर हल्ला करणे, निरपराध लोकांचे जीव घेणे, हा मानवतेवर हल्ला मानला जातो आणि अशा कृत्यांना युद्धगुन्हा ठरवले जाते.

आज अमेरिकेतील नागरिकदेखील रस्त्यावर उतरून नो किंग्स आंदोलनात सहभागी होत आहेत. ही निदर्शने मानवतेच्या बाजूने उभी आहेत. निष्पाप लोकांचे जीवन अमूल्य आहे, हे सांगणारी ही चळवळ आहे. संवेदनशील लोक आपल्या देशातील सत्तेविरोधातही आवाज उठवत आहेत, ही बाब विशेष महत्त्वाची आहे.

जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार खनिज तेल, पेट्रोल आणि डिझेल आहे. त्याचबरोबर घरगुती वापरासह विविध उद्योगांमध्ये गॅसचा वापर वाढला आहे. हे युद्ध लांबले, तर अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये बेरोजगारी वाढेल. परिणामी या देशांमध्ये सुद्धा अराजकता निर्माण होईल. आधुनिक औषधनिर्मितीत पेट्रोकेमिकल्सचा मोठा वापर होतो. त्यामुळे या युद्धाचा औषध उत्पादनावरही विपरीत परिणाम होऊन जगभरातील देशातील अनेक रुग्णांना औषधाअभावी जीव गमवावा लागेल.

शेती उत्पादन वाढवण्यासाठी खतांची गरज असते. ही खते तयार करण्यासाठी लागणारे नायट्रोजन आणि फॉस्फेट मोठ्या प्रमाणावर आयात करावे लागतात. युद्धामुळे आयातीवर परिणाम होऊन खतांचा तुटवडा निर्माण होईल आणि शेती उत्पादन घटेल. परिणामी अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन भूकबळी वाढण्याची शक्यता आहे.

एकूणच, युद्ध थांबवा आणि लोक वाचवा! ही मोहीम आता जगभरातील सामान्य लोकांनी आपल्या हातात घ्यावी, हीच काळाची गरज आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## अडाणी

यावे आणि फसवावे
आहो मुर्खशिरोमणी
समजून ही समजेना
वेडे रक्त फिरे धमणी

शिकवायं तयार सारे
माणसेमोठी शहाणी
देतराहतात सल्ले ते
बदले बावळटराहणी

परिक्षेच्या वेळीचं हो
अवस्था केविलवाणी
कसे मिळवावे उदिष्ट
अरे बुध्दीपडली उणी

उद्योजक लुटे दिवसा
लुटूवूनि घेतो अडाणी
चूक सर्वस्वी जनतेची
लागूकरा आणीबाणी

सहजी सापडेजाळ्यां
ढोंगीबाबाफसवेकुणी
जागा दाखविली मला
आहोत आपले ऋणी

गुलाम बनवायं आतूर
बांधून घालते दावणी
जागो जागी उभारली
महान मुढांचीछावणी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# ७१ लाख लाडक्या बहिणी अपात्र !

गेले सुमारे २० महिने लाडकी बहीण योजना सुरु आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात रुपये १५०० दरमहा जमा होत आहेत. या योजनेमुळे महायुतीचे सरकार सत्तेवर येऊ शकले होते. या योजनेच्या ज्या अटी होत्या त्यामध्ये कुटुंबातील कोणीही सरकारी नोकरीत नसणे, तसेच कुटुंबात चार चाकी वाहन नसणे ह्या होत्या.

तथापि अनेक लाडक्या बहिणींनी हे सारे असतानाही अर्ज केले व गेले अनेक महिने पैसेही घेतले. या योजनेत अनेक अपात्र महिलांनी लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खात्री करण्यासाठी इ केवायसी बंधनकारक केली होती. सरकारने केलेल्या




पडताळणीत सरकारचे दरमहा १०६५ कोटी रुपये वाचणार आहेत. एप्रिल २०२६ पासून या अपात्र महिलांना दरमहा मिळणारे १५०० रुपये बंद केले जाणार आहेत. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली.

या अगोदर सुद्धा अनेक पुरुष कर्मचाऱ्यांनी तसेच नोकरी करणाऱ्या महिलांनी अर्ज करून दरमहा १५०० रुपये मिळविले होते. सरकारने याची पडताळणी केल्यानंतर ही गोष्ट लक्षात आली होती.

वास्तविक ही योजना सुरु करताना सर्व अटी चेक करावयास हव्या होत्या. त्या व्यवस्थित चेक झाल्या नाहीत. अपात्र महिलांना गेल्या सुमारे २० महिने मानधन दिले गेले हे प्रश्न आता विरोधकांकडून विचारले जाण्याची शक्यता आहे. दरम्यान इ केवायसी करताना महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. त्यांना एक संधी म्हणून ३० एप्रिल पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

